मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा : महापालिकेचे आवाहन

## यंदा प्रथमच मनपा शाळांमध्ये "इको-फ्रेंडली गणेशमूर्ती" सजावट स्पर्धा आयोजित : पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महापालिकेतर्फे उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सव तसेच नवरात्रोत्सवाच्या काळात शहरातील मूर्ती तयार करणारे कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादकांनी केवळ शाडू मातीच्या मुर्तींची निर्मिती किंवा विक्री करावी. नागरिकांनीही केवळ पर्यावरणपूरक शाडू मातीच्या नैसर्गिक रंग वापरून तयार केलेल्या आणि पाण्यात सहज विरघळणाऱ्या मुर्त्या तसेच पर्यावरणपूरक सजावटीचे पूजा साहित्य वापरून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि शहरातील नागरिकांनी नेहमीच पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यास प्राध्यान्य दिले आहे. आपले पिंपरी चिंचवड पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित राहील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ही शहरातील प्रत्येक नागरिकाची आहे. त्यादृष्टीने नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा. तसेच मूर्ती तयार करणारे सर्व कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादक यांनी केवळ पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या नैसर्गिक रंग वापरून पाण्यात सहज विरघळणाऱ्या मातीच्या मूर्तींची निर्मिती करावी. तसेच नागरिकांनी आपली व आपल्या शहराच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहनही आयुक्त सिंह यांनी केले आहे. गणेशमुर्ती स्टॉलबाबत परवानगी घेऊन परवानगीची १ प्रत पर्यावरणपूरक मूर्ती विक्रीचे दुकान किंवा स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक असणार आहे,



### महापालिकेच्या वतीने मार्गदर्शक सूचना

» भारत सरकाच्या केंद्रीय पर्यावरण वने वातावरणीय बदल विभागाच्या वतीने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १२ मे २०२० रोजी मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केलेली आहेत. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम १९७४ तसेच उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव २०२४ बाबत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

### आरोग्य विभाग राबवणार जनजागृती मोहीम

» महापालिकेचा आरोग्य विभाग ऑन-द- ग्राउंड जनजागृती मोहीम सुरू करत आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जागरुकता मोहिम राबविणा-या संस्थांच्या माध्यमातून गूगल फॉर्म भरून स्पर्धेसाठी नोंदणी केली जात असल्याची माहिती आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी दिली.

"कोणतेही सामाजिक बदल आत्मसात करण्यासाठी वेळ लागतो, पण आपली मानसिकता आपण बदलली तर आपण नक्कीच बदल घडवू शकतो. लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या गणेशोत्सवाचे महत्व आजच्या बदलत्या काळात आणि परिस्थितीतही टिकून आहे. हा उत्सव हा पारंपरिक पद्धतीने साजरा करताना तो पर्यावरणपूरक पद्धतीनेही साजरा करण्याचा आग्रह धरुन, पुढच्या पिढीला नवीन संदेश देण्यासाठी पुढाकार घेवूया..!.

- शेखर सिंह,आयुक्त,पिंपरी-चिंचवड महापालिका.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेचे पाणीगळती रोखण्याचे स्वप्न अधुरे

## नळ जोडणी स्मार्ट वॉटर मीटर योजना कागदावरच, 140 कोटी खर्चून केवळ 9,268 नळांना मीटर, उर्वरित मीटरचे काम रखडले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

नळाचे पाणी वापराचे प्रमाण आणि बिल अचूक व्हावे, याकरिता महापालिकेच्या स्मार्ट सिटी योजनेतून १४० कोटी रुपये खर्चून केवळ नऊ हजार २६८ नळ जोडणींना स्मार्ट वॉटर मीटर बसवण्यात आले. मात्र, शहरात आणखी एक लाख साठ हजार नळ जोडणीला स्मार्ट वॉटर मीटर बसवले गेले नाहीत. त्यामुळे शहरातील नळ जोडणीला स्मार्ट वॉटर मीटर बसवण्याची मोहीम कागदावर राहिल्याचे दिसून येत आहे. यामुळे स्मार्ट वॉटर मीटर न बसवल्यामुळे पाणी गळती रोखण्यास अपयश येऊ लागले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्मार्ट सिटी कंपनीच्या वतीने शहरातील ९ हजार २६८ नळांना जुने मीटर काढून स्मार्ट वॉटर मीटर लावण्यात आले आहेत. पाणी वापराचे प्रमाण आणि बिलिंग अचूक व्हावे, यासाठी सुमारे १४० कोटी रुपये खर्च करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी ठरल्यास शहरातील निवासी व वाणिज्य अशा सर्व नळ जोडणीला स्मार्ट मीटर बसवले जाणार होते. मात्र, या कामात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा सहभाग नसल्याने या योजनेच्या

यशस्वीतेबाबत शंका उपस्थित होऊ लागली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात समन्यायी पद्धतीने पाणी पुरवठा करण्यात यावा. याकरिता पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने मोठा गाजावाजा करीत सुपरव्हायझरी कंट्रोल अँड डाटा ॲक्विझिशन (स्काडा) प्रणाली सुरू केली. तरीही शहरात तब्बल ४० टक्के पाण्याची गळती व चोरी होते. त्याचा शोध घेण्यात स्काडा प्रणालीला अद्याप यश मिळाले नाही. त्यामुळे या प्रणालीवर सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी वारंवार शंका उपस्थित केल्या आहेत. शहरातील मोठ्या हाऊसिंग सोसायट्या, बंगलो व उच्चभ्रू वस्तीमध्ये तसेच, जेथून मीटर चोरीला जाणार नाहीत तसेच, त्याची नासधूस होणार नाही, अशा भागात हे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत.



स्मार्ट सिटी कंपनीने शहरातील विविध भागांत स्मार्ट वॉटर मीटर बसवले आहेत. त्यांचे सर्व नियंत्रण निगडी येथील कमांड अँण्ड कंट्रोल सेंटरमधून केले जाते. या प्रणालीमुळे शहराचा पाणीपुरवठा व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि बिलिंगसाठी स्मार्ट मीटरचा उपयोग होत आहे. बिलिंग संदर्भातील तक्रारी सोडवण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरली आहे.

- श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग महापालिका

# कोथरूडच्या सोसायटीला 'डीम्ड कन्व्हेयन्स' द्यावे

## संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी हे आदेश दिले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूड येथील एका सहकारी गृहनिर्माण संस्थेला मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) देण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने जिल्हा उपनिबंधकांना (डीडीआर) दिले आहेत. या संदर्भात या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांनी हे आदेश दिले आहेत.

पुण्याच्या कोथरूड येथील शीतल कॉम्प्लेक्स सहकारी गृहरचना संस्था आणि या संस्थेचे अध्यक्ष जगदीश नथुराम लाटे यांनी ॲड. चैतन्य नित्के यांच्यामार्फत राज्य सरकारसह, उपनिबंधक आणि या गृहप्रकल्पाचा विकासकाविरुद्ध यांच्याविरुद्ध १९६३ च्या महाराष्ट्र मालकी सदनिका कायद्याच्या (मोफा) संबंधित कलमांतर्गत 'डीम्ड कन्व्हेयन्स'साठी रिट याचिका दाखल केली होती.

आठ दुकाने, सदनिका क्रमांक ए-३ आणि ए-६ आणि २५० चौरस फुटाच्या गॅरेजला डीम्ड कन्व्हेयन्स प्रमाणपत्राची मागणी करणारी याचिका फेटाळल्याने या सोसायटीने या 'मोफा' कायद्याच्या कलम ५ अ अंतर्गत संबंधित अधिकाऱ्याने २८ जून २०२२ रोजी दिलेल्या या आदेशाला आव्हान दिले होते.

विकासकाने कोथरूड गावातील एकूण १,५४३ चौरस मीटरच्या भूखंड सर्व्हे क्रमांक १२० वर सोसायटी विकसित केली होती आणि सोसायटी सदस्याने दुकान क्रमांक १ ते २, ५ ते ८, फ्लॅट क्र. ए ३ आणि ए ६ आणि एक गॅरेज खरेदी केले होते. त्यासाठीचा संपूर्ण खरेदी मोबदला दिला होता. तथापि, विकासकाने १९८६ मध्ये मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्यूटी) भरले नाही. विकासकाने या मालमत्तेचे मालक असलेल्या सोसायटी अध्यक्षांच्या नावे विक्रीसाठी रीतसर नोंदणीकृत करारनामा अमलात आणला.



### प्रवर्तकाने प्रकल्पपूर्तीसाठी सर्व आवश्यक पावले उचलणे आवश्यक : न्यायालय

» न्यायमूर्ती देशमुख यांनी आदेशात नमूद केले, की 'मोफा' कायद्याच्या कलम ११ च्या तरतुदीनुसार प्रवर्तकाने त्याचा प्रकल्पपूर्तीसाठी सर्व आवश्यक पावले उचलणे आवश्यक आहे आणि नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेला त्याचे या प्रकल्पातील हक्क, मालकी सांगणे आवश्यक आहे. या संदर्भात जमीन, इमारत आणि सर्व संबंधित कागदपत्रे अमलात आणलेल्या करारानुसार सादर करणे अनिवार्य आहे. जर विकासकाने तसे न केल्यास संबंधित प्राधिकत अधिकाऱ्याने विकासकाच्या भूमिकेतून ही प्रमाणपत्रे प्रदान करून याचिकाकर्त्यांना या भूखंड आणि इमारतीच्या अभिहस्तांतरण कराराची नोंदणी करण्यास मदत केली पाहिजे.

### 'कन्व्हेयन्स'ची अंमलबजावणी

» ॲड. नित्के यांनी विकासकाने सोसायटीच्या बाजूने केलेल्या 'कन्व्हेयन्स डीड'च्या आधारे सर्व तपशील न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क भरल्यानंतर, विकासक या संदर्भात 'कन्व्हेयन्स'ची अंमलबजावणी करेल, अशी त्यात तरतूद असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. १९९७-९८ मध्ये लाटे यांनी मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क भरल्यानंतरही विकासकाने कन्व्हेयन्स डीडद्वारे या गृहप्रकल्पातील संबंधित सदनिका, दुकाने आणि गॅरेजचे अभिहस्तांतरण सोसायटीला न केल्याने सोसायटीचा पुनर्विकास करणे अशक्य झाले.

# हर्षवर्धन पाटील-शरद पवार यांची भेट, बंद दाराआड बैठक

## मांजरी येथे माजी मंत्री व भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेतली, त्यामुळे चर्चांना अधिकच उधान आले.

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात अनेक हालचाली सुरु झाल्या आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करून निवडणुक लढविण्याची तयारी अनेक नेत्यांनी केली आहे.

त्यानुसार गाठीभेटीचे सत्र सुरू झाले आहे. अशातच मंगळवारी मांजरी येथे माजी मंत्री व भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे या चर्चांना अधिकच उधान आले

वसंत दादा शुगर इन्स्टिट्युट येथील बैठक संपल्यानंतर पवार आणि पाटील यांच्यात बंद दाराआड बैठक झाली. गेल्या काही दिवसांपासून हर्षवर्धन पाटील भाजपचे कमळ सोडून राष्ट्रवादीची तुतारी हाती घेण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू होती.

त्यातच मंगळवारच्या या भेटीमुळे त्या शक्यतेला बळ मिळाले. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली. ते समजु शकले नाही.

इन्स्टिट्यूटच्या बैठकीला शरद पवार यांच्यासह, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, भाजप नेते हर्षवर्धन पाटील, माढ्याचे आमदार बबन शिंदे, राजेश टोपे, अहमदनगरचे विवेक कोल्हे आदी नेते उपस्थित होते.

दरम्यान, इंदापूर विधानसभा निवडणूक भाजपकडून लढवण्यासाठी हर्षवर्धन पाटील इच्छुक आहेत. मात्र जेथे ज्या पक्षाचा आमदार त्याच पक्षाला तिकीट मिळणार असल्याचे महायुतीचे सूत्र आहे. त्यामुळे आता भाजपकडून हर्षवर्धन पाटील यांना इंदापूरमधून उमेदवारी मिळण्याची शक्यता नसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे..

राजकीय विषयावर चर्चा नव्हती, असं हर्षवर्धन पाटील म्हणाले. कार्यकर्त्यांचा आग्रह आहे की, तुम्ही निवडणूक लढा, असं हर्षवर्धन पाटील यांनी सांगितलं आहे. त्यामुळेच हर्षवर्धन पाटील शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.




### हर्षवर्धन पाटील काय म्हणाले?

» "माझी आज शरद पवार यांच्यासोबत भेट झाली. आम्ही अडीच-तीन वर्ष सोबत होतो. काही विषय होते, पण आमच्यात कुठलीही राजकीय चर्चा झालेली नाही. लोकसभेच्या निवडणुकीवेळी आमची जी चर्चा झाली होती, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी अशी आमच्यात चर्चा झाली होती. त्यावेळी अजित पवार म्हणाले होते की, देवेंद्र फडणवीस इंदापूरबाबत जो निर्णय घेतील तो आपल्यालामान्य असेल. त्यामुळे आम्ही आता वाट बघतोय की, देवेंद्र फडणवीस इंदापूरबद्दल काय निर्णय घेतात", अशी प्रतिक्रिया हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

### देवेंद्र फडणवीस काय म्हणाले?

» "कोण कुणाची भेट घेतं आहे, याकडे जाऊ नका. भारतीय जनता पार्टी खूप मजबूत आहे. भारतीय जनता पार्टीत खूप मोठ्या प्रमाणात लोक आज प्रवेश करत आहेत. गेल्या आठवड्यातही मोठ्या प्रमाणात प्रवेश केला होता. त्याआधीच्या आठवड्यातही मोठ्या प्रमाणात लोकांनी प्रवेश केला होता. पुढेही खूप प्रवेश होणार आहे. निवडणुकीच्या काळात हे खरं आहे की, काही इकडचे तिकडे जातात किंवा तिकडचे इकडे येतात. पण मला विश्वास आहे, हर्षवर्धन पाटील असतील किंवा इतर सर्व आमचे नेते असतील, ते आमच्यासोबतच राहतील", असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# महापालिकेकडून कचरावेचकांच्या मुलांसाठी योजना

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा ऐतिहासिक निर्णय : 5000 कचरावेचक कुटुंबांतील मुलांना लाभ मिळणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील कचरावेचक व्यक्तींच्या पाल्यांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याच्या विषयासह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.




पिंपरी चिंचवड महा-नगरपालिकेच्या हद्दीत राहत असलेले व कचरावेचकांचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांचे जीवनमान उंचविण्याच्या तसेच त्यांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून महापालिकेच्या वतीने शैक्षणिक अर्थसहाय्य देण्याच्या योजनेस प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

**शैक्षणिक अर्थसहाय्य योजना :**

या योजनेअंतर्गत, इयत्ता १ली ते ७वी मधील विद्यार्थ्यांना वार्षिक ४,००० रुपये, तर इयत्ता ८वी ते १०वी मधील विद्यार्थ्यांना वार्षिक ६,००० रुपये अर्थसहाय्य दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पालकांनी महापालिका हद्दीतील रहिवासी असणे आणि नोंदणीकृत कचरावेचक संघटनेचे सभासद असणे आवश्यक आहे.

**उच्च गुणवत्तेसाठी प्रोत्साहन बक्षीस :**

इयत्ता १०वी आणि १२वी मध्ये ५०% पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे. महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या १०वी च्या विद्यार्थ्यांना १०,००० रुपये, तर १२वीच्या विद्यार्थ्यांना १५,००० रुपये बक्षीस दिले जाणार आहे. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी ही रक्कम अनुक्रमे ५,००० आणि ७,५०० रुपये असेल.

**बैठकीतील मंजूर विषय..**

» महापालिका परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती अदा करणे, शहराच्या सौंदर्यीकरणात भर टाकणाऱ्या दृष्टीने सुशोभीकरणाची कामे करणे, भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील रस्त्याची स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे, मनुष्यबळ तसेच यांत्रिकी पद्धतीने दैनंदिन साफसफाई व स्वच्छतेचे कामकाज करण्यासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे आदी विषयांसह तरतूद वर्गीकरणाच्या विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

**मोफत सायकल योजना :**

इयत्ता ८वी ते १०वी मधील ५०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ७,००० रुपयांपर्यंतची सायकल खरेदीसाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे. ही योजना विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात सुधारणा आणण्यासाठी आणि त्यांना शाळेत जाण्यास प्रोत्साहित करण्यासाठी आखली गेली आहे.

या योजनांमुळे सुमारे ५,००० कचरावेचक कुटुंबांतील मुलांना लाभ मिळणार असल्याचे महापालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रमुख सुनील पवार यांनी सांगितले. "आमचे उद्दिष्ट आहे की या मुलांना उत्तम शिक्षण मिळावे आणि त्यांच्या कुटुंबांचे जीवनमान उंचावावे," असे त्यांनी नमूद केले.

या योजनांसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया १ सप्टेंबरपासून सुरू होणार असून, ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही पद्धतींनी अर्ज स्वीकारले जातील. महापालिकेच्या सर्व २० क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

# अनुदानाची रक्कम पूरग्रस्तांच्या बँक खात्यात जमा

## पिंपरी-चिंचवड शहरातील 7 हजार 519 कुटुंबांना मिळाले 7 कोटी 51 लाख 90 हजार

**पिंपरी | प्रतिनिधी**

अतिवृष्टी व धरणातून केलेल्या विसर्गामुळे नदीकाठच्या अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरून संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले होते. ज्या घरात पाणी शिरले अशा कुटुंबांना प्रशासनातर्फे मदतीचे वाटप सुरू केले आहे. शासनाने विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब ५ हजारऐवजी सरसकट १० हजार रुपये अनुदान देण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील सात हजार पेक्षा अधिक कुटुंबांना ही मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शासकीय विश्रामगृह येथे पूरग्रस्तांना शासनातर्फे देण्यात येणाऱ्या मदतीच्या धनादेशाचे प्रातिनिधीक स्वरूपात वाटप करण्यात आले. अनुदानाची रक्कम सर्व कुटुंबांच्या बँक खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे, यशवंत माने, तहसीलदार किरण सुरवसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते. नागरिकांनी पूर परिस्थितीत अधिक दक्षता घ्यावी आणि प्रशासनाला सहकार्य करावे. खडकवासला धरणातून विसर्ग सोडल्यावर नदीपात्रात प्रवाहाला अडथळा येणार नाही यासाठी महानगरपालिकेने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पवार यांनी यावेळी दिल्या.

जुलै २०२४ मध्ये अतिवृष्टी व धरणातून केलेल्या विसर्गामुळे नद्यांना पूरस्थिती झाली होती. अनेक नागरिकांचे नुकसान झाले होते. ज्या घरात पाणी शिरले अशा कुटुंबांना प्रशासनातर्फे मदतीचे वाटप सुरू करण्यात आले आहे. शासनाने विशेष बाब म्हणून प्रतिकुटुंब ५ हजार ऐवजी १० हजार रुपये अनुदान देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार पुणे शहरातील ७ हजार ९७७ कुटुंबांना ७ कोटी ९७ लाख ७० हजार, हवेली तालुक्यातील ६८२ कुटुंबांना ६८ लाख २० हजार, पिंपरी-चिंचवड शहरातील ७ हजार ५१९ कुटुंबांना ७ कोटी ५१ लाख ९० हजार आणि मुळशी तालुक्यातील ९० कुटुंबांना ९ लाख रुपये अनुदान देण्यात येत आहे. याशिवाय विजेचा झटका लागून मयत झालेल्या दोन व्यक्तींच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख, तर मुळशी तालुक्यातील आदरवाडी येथे दरड कोसळून मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांना ४ लाखाचे अनुदान वितरित करण्यात आले आहे.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, उपविभागीय अधिकारी स्नेहा किसवे, यशवंत माने, तहसिलदार किरण सुरवसे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

# रस्त्यांवरची खडी ठरतेय जीवघेणी

## खड्डे उखडून आणि मिक्सरमधून पडलेली खडी रस्त्यांवरच, वाहनचालकांची कसरत, अपघाताचा धोका



**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागात गृहप्रकल्प, रस्त्यांची कामे सुरू आहेत. मुख्य रस्त्यावरून सिमेंट कॉंक्रिट (आरएमसी) हायवा, ट्रक (मिक्सर) वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या मिक्सरमधून रस्त्यावर अनेक ठिकाणी खडी पडत असून ती तशीच साचून राहात आहे. त्याशिवाय महापालिकेने बुजवलेले खड्डेही उखडले आहेत. त्या खड्ड्यांची खडी रस्त्यावर अस्ताव्यस्तपणे पडलेली आहे. यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागत असून दुचाकी घसरून अपघात होण्याची दाट शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचे नागरीकरण वेगाने होत आहे. शहराच्या चारही बाजूने गृहप्रकल्पाची कामे होत आहेत. रस्त्याची कामे देखील मोठ्या प्रमाणात होत आहेत. यामुळे अनेक ठिकाणी बांधकामांनी वेग घेतला आहे. पूर्वी बांधकाम करताना स्लॅब बांधताना जागेवरच वाळू, सिमेंट एकत्र करून बांधले जायचे. मात्र आधुनिकीकरणाच्या जमान्यात यंत्राला मोठी मागणी आहे. शहरातील अनेक ठिकाणी आरएमसी (रेडी मिक्स कॉंक्रिट) प्लॅन्ट उभे करण्यात आलेले असून, मागणी येईल त्या भागात मिक्सरची गाडी माल घेऊन जात असते. या मिक्सरच्या गाड्यांची मागणी वाढली आहे. बांधकामासह रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाच्या कामासाठीही त्यांचा उपयोग करण्यात येतो. ताथवडे, पुनावळे, रावेत, मोशी, चऱ्होली यासह इतर ठिकाणाहून बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी मागणीनुसार मिक्सरच्या गाड्या जातात. या गाड्यांमधून सिमेंट, वाळू आणि खडी एकत्र केलेला माल रस्त्यावर अनेक ठिकाणी पडतो. या पडलेल्या मालामुळे काही ठिकाणी ढीग तयार होतात तर काही ठिकाणी ही खडी विखुरली जाते. विखुरलेल्या खडीमुळे अनेक दुचाकीस्वार घसरून पडून जखमी होण्याची शक्यता आहे.

शहरातील अनेक रस्त्यावर छोटी-मोठ्या साईजची खडी विखुरलेली दिसत आहे. महत्त्वाच्या मार्गांवर सलग ठिकाणी जास्त खडी पडली आहे. दरम्यान या खडीवरून दुचाकी चालक पडून जखमी होऊ लागले आहेत. यामुळे या सिमेंट कॉंक्रिटची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मागणी होऊ लागली आहे.

### खड्डे भरले, पण, खडी लगेच खड्ड्याबाहेर

» शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यावर पावसामुळे खड्डे पडले होते. महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून खड्डे बुजवण्याचे काम करण्यात आले. खड्डे बुजवताना डांबराचे योग्य प्रमाण नसल्याने अनेक ठिकाणी खड्ड्यांबाहेर उघडी पडलेली आहे. खडी बाहेर पडल्याने खड्डे पुन्हा दिसू लागले आहेत. त्यामुळे खड्डे आणि खडीमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खडीवरून घसरून आणि खड्ड्यात गाडी आदळून कधीही अपघात होण्याची शक्यता आहे.

### पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा

» आरएमसी मिक्सरची वाहतूक करणारे हायवा ट्रक बांधकाम व्यावसायिकांचे आहेत. अनेकदा गृहप्रकल्पातून अथवा आरएमसी प्लॅटमधून बाहेर पडलेल्या वाहनाच्या टायरला देखील चिखलाने माखलेला असतो. तोच ट्रक रस्त्यावर आल्यावर चिखल संपूर्ण रस्त्यावर पडून राहतो. या पडलेल्या खडीमुळे दुचाकी चालकांचे वाहन चालवणे अवघड झाले आहे. तरी अशा धोकादायक आणि खडी सांडणाऱ्या मिक्सरवर पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# 'बीआरटीएस'च्या थांब्यांवर अवैध होर्डिंग्ज

## महापालिकेसह पीएमपीएमएलच्या यंत्रणेचे दुर्लक्ष : नियमांचे उल्लंघन झाल्याचे माहिती अधिकारात उघड




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टिम अर्थात 'बीआरटीएस'चा बोजवारा उडालेला असताना या प्रकल्पाकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केले आहे. यामुळे 'बीआरटीएस'चे मार्ग आणि थांब्यांवर मोठ्या प्रमाणावर अवैध होर्डिंग उभारण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्त्या कनीझ सुखरानी यांनी माहिती अधिकाराद्वारे मिळवलेलेल्या माहितीनुसार या 'बीआरटीएस' मार्गावरील बस थांबे आणि मार्गावर लावलेल्या होर्डिंगच्या मुदतवाढीसाठी कोणतेही करार झालेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे येथील जाहिरात फलक अवैध असून, ते तातडीन हटवणे गरजेचे आहे.

सुखरानी यांनी या संदर्भात पुणे महापालिका आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) याबाबत दोषी असल्याचे सांगून, या यंत्रणा शहरातील सार्वजनिक सुरक्षा आणि सुविधांपेक्षा महसूल निर्मितीला आणि कमाईलाच प्राधान्य देत असल्याचा आरोप केला. पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या दहा बसथांब्यांवर एकूण ४० होर्डिंग आहेत.

'पीएमपीएमएल'च्या अधिकाऱ्यांच्या दाव्यानुसार, या जाहिरात फलकांच्या कराराच्या मुदतवाढीबाबत गेल्या महिन्यात संबंधितांना पत्र पाठवण्यात आले आहे. कोविड महामारीच्या काळात या भागांत कोणतेही नवे जाहिरात फलक लावण्यात आले नव्हते. त्यामुळे सध्या येथे उभारलेल्याच फलकांना मुदतवाढ देण्यात आली. मात्र, नवीन मुदतवाढीची नोंदणीकृत कागदपत्रे तयार करण्यात आलेली नाहीत.

'पीएमपीएमल'च्या दाव्यानुसार या पत्राच्या प्रती पुणे महापालिका आणि होर्डिंग्जशी संबंधित जाहिरात कंपनी 'पायोनियर पब्लिसिटी लिमिटेड' यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. मात्र, यामुळे काहीही झाले नाही आणि बस थांब्यावरील बेकायदेशीर जाहिरात फलक तसेच कायम आहेत. त्यामुळे सार्वजनिक जागांच्या वापरावरील नियंत्रणासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलींच्या चौकटीचे सर्रास उल्लंघन होत आहे.

> पुणे महापालिका आणि संबंधित जाहिरात कंपनीला मुदतवाढीचे पत्र देण्यात आले आहे, मात्र, या कालावधीच्या मुदतवाढीसाठी कोणताही करार झालेला नाही. पुणे महापालिका हद्दीत ९ मार्च २०२० पासून आगामी पाच वर्षे आणि दोन महिन्यांनी मुदतवाढ करण्यात आली आहे. तर पिंपरी-चिंचवडच्या हद्दीत १६ डिसेंबर २०१९ पासून पुढील पाच वर्षे आणि कोविड साथीमुळे दोन महिन्यांची वाढ करण्यात आली आहे.
>
> \- दत्तात्रय झेंडे, प्रमुख, पीएमपीएमएल वाहतूक विभाग.